navbharat
Mega Developers

# DHARAVI COMPILED MEDIA REPORT
28 Jun, 2025

## Total Mention 21

| Print | Financial | Mainline | Regional | Periodical |
|---|---|---|---|---|
| 7 | N/A | N/A | 7 | N/A |

| Tv | Business | English | Hindi | Regional |
|---|---|---|---|---|
| 11 | N/A | N/A | N/A | 11 |

| Online |
|---|
| 3 |

## Print

| No | Newspaper | Headline | Edition | Pg |
| --- | --- | --- | --- | --- |
| 1. | Aaple Mahanagar | Aditya Thackeray alleges that Dharavi is the world's biggest land scam | Mumbai | 1 |
| 2. | Aaple Mahanagar | The ghost of inadequacy haunts the hearts of Dharavi residents | Mumbai | 4 |
| 3. | Saamana | Dharavi redevelopment is the world's biggest land scam | Mumbai | 7 |
| 4. | Maharashtra Times | Curious about redevelopment | Mumbai | 3 |
| 5. | Nav Rashtra | A plot to throw workers out of Mumbai | Mumbai | 1 |
| 6. | Mumbai Tarun Bharat | A one-step program to confuse Dharavi residents is currently underway | Mumbai | 3 |
| 7. | Loksatta | Adani Group gets Kurla Mother Dairy site | Mumbai | 3 |

Aaple Mahanagar • 28 Jun • Dharavi

## Aditya Thackeray alleges that Dharavi is the world's biggest land scam

| 1 • PG | 201 • Sqcm | 45261 • AVE | 375K • Cir | Middle Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# धारावी जगातला सर्वात मोठा भूखंड घोटाळा

## आदित्य ठाकरे यांचा आरोप

**प्रतिनिधी । आपलं महानगर वृत्तसेवा**



**मुंबई :** धारावी पुनर्विकास प्रकल्पाने (डीआरपी) नुकतीच गणेश नगर, मेघवाडीतील पात्र-अपात्र झोपडीधारकांची प्राथमिक यादी अर्थात प्रारुप परिशिष्ट २ प्रसिद्ध केले. या यादीमध्ये ५०५ झोपडीधारकांपैकी केवळ १०१ झोपडीधारकच धारावीत विनामूल्य घर मिळण्यास पात्र ठरल्याने धारावीकर भयभीत झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर मेघवाडीतील रहिवाशांनी शुक्रवारी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीनंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधताना धारावी हा जगातला सर्वात मोठा भूखंड घोटाळा असू शकतो. भाजपला हा घोटाळा आम्ही करू देणार नाही. मुंबई आणि धारावीकरांसाठी आम्ही शेवटपर्यंत लढा देऊ, असा इशारा आदित्य ठाकरेंनी दिला.

आदित्य ठाकरे पुढे म्हणाले की, या जमिनीवर सुमारे १५० वर्षांपासून रहात असल्याचे मेघवाडीतील रहिवाशांनी मला सांगितले. तरी पहिल्या यादीत ८० टक्के रहिवाशांना अपात्र ठरवण्यात आले आहे. अत्यंत चुकीच्या निकषांवर आधारित सर्वेक्षण आणि पडताळणी सुरू आहे. जास्तीत जास्त धारावीकरांना अपात्र ठरवून देवनारच्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर रहायला पाठवायचा यांचा डाव आहे. सन २०२२ पर्यंतची घरे पात्र ठरवावीत आणि धारावीकरांना धारावीतच घर मिळावे, अशा दोन महत्त्वाच्या मागण्या आहेत. या मागण्या धुडकावून लावत धारावीची अब्जावधी रुपयांची जमीन अदानीच्या घशात घातली जात आहे. अदानी समूह नेमका कुणाचा विकास करतंय? धारावीकरांचा की स्वतःचा? कदाचित मुंबईचे नाव अदानीनगर करण्याचा भाजपचा विचार आहे, आम्ही हे होऊ देणार नाही, असेही आदित्य ठाकरे म्हणाले.

Aditya Thackeray alleged the Dharavi redevelopment is the world's biggest land scam, accusing BJP of favoring Adani Group. After meeting Meghawadi residents, he criticized the flawed survey disqualifying most Dharavikars. He demanded eligibility up to 2022 and in-situ housing, vowing to fight for Mumbai and protect Dharavikars' rights.

Aple Mahanagar • 28 Jun • Dharavi

## The ghost of inadequacy haunts the hearts of Dharavi residents

| 4 • PG | 533 • Sqcm | 119983 • AVE | 375K • Cir | Top Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# धारावीकरांच्या मानगुटीवर अपात्रतेच्या भुताचे बस्तान

धारावी पुनर्विकास प्रकल्पाने (डीआरपी) नुकतीच पात्र-अपात्र झोपडीधारकांची प्राथमिक यादी अर्थात प्रारुप परिशिष्ट २ प्रसिद्ध केले. या पहिल्या यादीतील केवळ २५ टक्केच झोपडीधारक धारावीत मोफत घर मिळण्यास पात्र ठरले असून तब्बल ७५ टक्के झोपडीधारक अपात्र ठरले आहेत. हीच सरासरी इतर पात्रता यादीत कायम राहण्याची शक्यता धारावी बचाव आंदोलन समिती आणि इतर स्वयंसेवी संस्थांनी व्यक्त केल्याने धारावीतील रहिवाशांमध्ये भीतीची लाट पसरली आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत डीआरपी आणि नवभारत मेगा डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेडकडून मागील काही महिन्यांपासून सर्वेक्षण सुरू आहे. या सर्वेक्षणाअंतर्गत धारावीकरांची कागदपत्रे तपासून झोपडीधारकांची पात्रता निश्चित केली जात आहे. हे सर्वेक्षण अंतिम टप्प्यात असतानाच प्राथमिक प्रारुप परिशिष्ट २ प्रसिद्ध करण्यात आले. या पहिल्या यादीत गणेश नगर, मेघवाडी झोपडपट्टीतील ५०५ झोपडीधारकांच्या घरांचा समावेश आहे. या यादीतील ५०५ पैकी फक्त २२८ झोपडीधारक आणि शाळा, धार्मिक स्थळे आदी ३८ बांधकामेच पात्र ठरली आहेत. त्यातही २२८ पैकी केवळ १०१ (सन २००० आधीचे) झोपडीधारकांनाच पात्रतेच्या निकषांनुसार धारावीत मोफत घर मिळणार असून उर्वरित ५९ झोपडीधारकांची धारावीबाहेरील भाडे तत्वावरील घरांत पाठवणी होईल. तर उरलेले झोपडीधारक धारावीतूनच हद्दपार होणार आहेत.

पहिली यादी पाहता उर्वरित याद्यांमध्येही अतिशय कमी संख्येने धारावीकर धारावीतच घर मिळवण्यास पात्र ठरण्याची आणि इतर धारावीबाहेर ढकलले जाण्याची दाट शक्यता आहे. धारावीकरांना धारावीतून हुसकावून लावण्याचा हा डाव या यादीमुळे अतिशय स्पष्टपणे उघड होत आहे. या यादीवर हरकती-सूचना नोंदवण्याची व पात्रतेसाठी पुन्हा प्रयत्न करण्याची संधी धारावीकरांना देण्यात येईल, असे डीआरपीकडून सांगितले जात आहे. परंतु ही दुबार संधी फक्त नावापुरतीच असेल, यात शंका नाही. धारावी पुनर्विकास प्रकल्प जाहीर झाल्यापासून वादाच्या भोवऱ्यात सापडलेला आहे. त्यातच या प्रकल्पाचे कंत्राट अदानी समूहाच्या हाती गेल्यापासून धारावीकरांना कुणी वालीच उरलेला नाही, अशी परिस्थिती आहे. नाही म्हटले तर धारावी बचाव आंदोलन समिती आणि इतर स्वयंसेवी संस्थांनी वेळोवेळी या प्रकल्पाच्या पारदर्शकिवरून आवाज उठवला आहे. पात्रतेचे निकष, सर्वेक्षण, मास्टर प्लानमधील त्रुटींवर बोटही ठेवले. परंतु डीआरपीकडून धारावीकरांचा आवाज दडपण्याचाच प्रयत्न झाला. काँग्रेस, शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाने धारावीकरांच्या लढ्याला पाठिंबा देत भव्य मोर्चा काढला. हा मोर्चाही विकासाच्या नावाखाली धारावीकरांच्या हक्काची जमीन हिसकावून घेणाऱ्या नफेखोरांना थांबवण्यात अशस्वी ठरला. या पुनर्विकास योजनेअंतर्गत, महायुती सरकार केवळ काही निवडक लोकांनाच विकास करण्यात मश्गुल आहे. मूळ धारावीकरांना बेघर करून त्यांची जागा विकासकाच्या घशात घातली जात आहे. धारावीची जागा कमी पडते म्हणून की काय पुनर्विकासाच्या नावाखाली मुंबई उपनगरातील शेकडो एकर जमीनही आंदण दिली जात आहे. मुद्रांक दरातील सवलतींचा वर्षावही सुरू आहे.

धारावीतील झोपडीधारकांना चांगले, समृद्ध जीवन देण्याच्या बाता मारणारे महायुती सरकार प्रत्यक्षात इथे फक्त मोठे कॉर्पोरेट आणि त्यांच्या नातेवाईकांनाच भरभराटीला आणण्याच्या विचारात असल्याचे दिसते. धारावी ही केवळ झोपडपट्टी नसून असंख्य लहान लहान व्यवसायांचे केंद्र आहे. हजारो नव्हे तर, लाखो लोकांचे पोटपाणी येथील लघुव्यवसायांवर अवलंबून आहे. धारावीतील काही खाद्यपदार्थ, कातडी, कापडी, हँडक्राफ्ट आदी प्रॉडक्ट्स थेट परदेशातही पाठवलेले जातात. तळमजला, एक मजला, दुमजला आदी घरे-गाळ्यांमध्ये १३ लाख धारावीकरांचे वास्तव्य आहे. अशा सर्व धारावीकरांना धारावीतच हक्काची जागा मिळावी, घराच्या बदल्यात किमान ५०० चौ. फुटांचे घर आणि व्यावसायिक गाळ्याच्या बदल्यात दुप्पट आकाराचे व्यावसायिक गाळे मिळावेत. धारावीत मोठ्या प्रमाणात मोकळी जागा असल्याने एकाही धारावीकराला हद्दपार करू नये, बीडीडी चाळींच्या धर्तीवर धारावीचा विकास व्हावा, अशी येथील रहिवासी संघटनांची मागणी आहे. परंतु या सर्वच मागण्यांना धुडकावून लावत इथला पुनर्विकास प्रकल्प दामटला जात आहे. धारावीतील पुनर्विकास सर्वेक्षणानुसार फक्त तळमजल्यावरील रहिवाशांनाच ग्राह्य धरले जात असून अशा रहिवाशांची संख्या केवळ १ ते दीड लाखच आहे. त्यातही पात्र-अपात्रतेच्या खेळात यातील ५९ हजार झोपडीधारकच धारावीत मोफत घरे मिळवण्यात पात्र ठरतील, अशी शक्यता आहे. बहुतांश रहिवाशांनी एक किंवा दोन मजले वाढवलेले असल्याने या सर्व रहिवाशांना धारावीबाहेर भाड्याने घरे दिली जाणार आहेत. महायुती सरकार, डीआरपी आणि एनएमडीपीएल पुनर्विकास धोरणाच्या नावाखाली करत असलेल्या दमनशाहीपुढे धारावीकर हतबल झालेत. पात्र-अपात्रतेची पहिली यादी जाहीर होतच प्रत्येक झोपडीधारक अधीरतेने आपले नाव शोधत होता. ज्याचे नाव यादीत आले नाही, असे झोपडीधारक डोळ्यात आसवे आणून माघारी परतत होते. यापुढच्या यादीत कुणाचे नाव राहणार, कुणाचे वगळणार या धास्तीत प्रत्येक झोपडीधारक आता दिवस ढकलतोय, धारावीकरांच्या मानगुटीवर बसलेले पात्र-अपात्रतेचे भूत आता उतरण्याची शक्यता दिसत नाही.

The Dharavi Redevelopment Project's first disqualification list has sparked outrage, with only 5% deemed eligible for free housing. NGOs allege mass evictions, flawed surveys, and favoritism towards corporates like Adani. Locals fear displacement, as extended structures are ignored. Protests continue, demanding fair criteria and rights for original Dharavikars.

Saamana • 28 Jun • Dharavi

## Dharavi redevelopment is the world's biggest land scam

| 7 • PG | 892 • Sqcm | 530108 • AVE | 910K • Cir | Top Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# धारावी पुनर्विकास हा जगातील सर्वात मोठा जमीन घोटाळा

## आदित्य ठाकरे यांचा हल्ला



मुंबई, दि. २७ (प्रतिनिधी) – धारावी पुनर्विकास प्रकल्प हा जगातील सर्वात मोठा जमीन घोटाळा आले. धारावीचा पुनर्विकास करताना पहिल्यांदा धारावीकरांचा विकास झाला पाहिजे. पण सरकार आणि अदानी तसे करत नाही. पुनर्विकासाच्या नावाखाली धारावीकरांची घरे रिकामी केली जाणार आहेत. पुनर्विकासात घरे दिली जातात. मात्र, धारावीकरांना घरे देण्याऐवजी अदानी धारावीकरांना देवनारच्या कचऱ्यात टाकतो आहे, असा संताप व्यक्त करत शिवसेना हे होऊ देणार नाही. शिवसेना धारावीकरांच्या खांद्याला खांदा लावून लढेल, असा निर्धार शिवसेना नेते, युवासेना प्रमुख, आमदार आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केला.

अदानीच्या धारावी पुनर्विकास प्रकल्पातून सुमारे ७५ टक्के रहिवाशांना धारावीबाहेर फेकले जाणार आहेत, अशी भीती धारावी बचाव आंदोलन समिती आणि स्वयंसेवी संस्थांनी व्यक्त केली आहे. पहिल्या यादीत अदानीने गणेशनगरच्या मेघवाडीतील ७५ टक्के रहिवाशांना अपात्र केले आहे. या धारावीतील रहिवाशांनी आज आदित्य ठाकरे यांची भेट घेत धारावीसाठी लढा उभारण्याची विनंती केली. यावेळी शिवसेना नेते, खासदार अनिल देसाई, शिवसेना सचिव साईनाथ दुर्गे, विभागप्रमुख आमदार महेश सावंत, माजी आमदार बाबूराव माने यांच्यासह शिवसेना, युवासेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

### *देवनार डम्पिंगवर अदानी, श्रीनिवास यांनी दोन महिने राहून दाखवावे!*

*धारावीकरांना घराबाहेर काढून त्यांना देवनार डम्पिंग ग्राऊंडवर टाकले जाणार आहे. मात्र, त्या आधी गौतम अदानी आणि डीआरपीचे सीईओ श्रीनिवास यांनी देवनारमध्ये दोन बंगले बांधावेत. या बंगल्यात दोन महिने राहून दाखवावे आणि नंतरच धारावीकरांना देवनारमध्ये पाठवण्याची हिंमत करावी, असे आव्हान आदित्य ठाकरे यांनी दिले.*

Aditya Thackeray slammed the Dharavi redevelopment as the world's biggest land scam, accusing Adani and the government of displacing locals. He warned Shiv Sena won't allow Dharavikars to be dumped in Deonar. Challenging Adani and DRP CEO Srinivas, he said they should live in Deonar before relocating residents there.

Maharashtra Times • 28 Jun • Dharavi

## Curious about redevelopment

| 3 • PG | 658 • Sqcm | 470805 • AVE | 1.3M • Cir | Middle Left | Mumbai Times |
|---|---|---|---|---|---|

Mumbai

# पुनर्विकासाबाबत उत्सुकता

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

धारावी पुनर्विकास प्रकल्पात (डीआरपी) चर्मोद्योग व्यावसायिकांनी पुनर्विकासाच्या दिशेने पावले टाकली आहेत. धारावीतील चर्मोद्योगाशी निगडित दुकानांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. खासगी मालकीच्या जमिनींवरील कारखान्यांचे सर्वेक्षण अद्याप बाकी आहे. खासगी जमीनमालकांनी त्यास विरोध दर्शवला असल्याने ही प्रक्रिया झालेली नाही. या परिस्थितीत, सद्यःस्थितीत चर्मोद्योग व्यावसायिकांचा 'डीआरपी'कडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होत असल्याचा दावा केला जात आहे. यापूर्वी विरोधात भूमिका घेणाऱ्या अनेक व्यावसायिकांनी पुनर्विकासाबाबत अनुकूलता दर्शवल्याचे सांगितले जाते.

## धारावीतील बहुतांश कारखाने, दुकानांचे सर्वेक्षण पूर्ण



'डीआरपी'मध्ये रहिवाशांप्रमाणेच उद्योग-व्यवसायांचे पुनर्विकास हे महत्त्वाचे आव्हान आहे. धारावीत चर्मोद्योगाशी निगडित सुमारे ६ हजार उद्योग, व्यवसाय आहेत. त्यात कारखाने, विक्री करणारी दुकाने, टॅनिंग आदींचा समावेश आहे. यापैकी सुमारे ८० टक्के युनिट्सचे सर्वेक्षण झाल्याचे सूत्रांनी सांगितले. या उद्योगाशी संबधित किरकोळ विक्री करणाऱ्या दुकानदारांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. मात्र अन्य काही कारखाने, कार्यशाळा या खासगी जमिनींवर असून, तिथल्या जमीनमालकांनी सहकार्य न केल्याने तेथील सर्वेक्षण झाले नसल्याचे सांगण्यात येते. मात्र या सर्व व्यावसायिकांनी सर्वेक्षणाच्या प्रक्रियेत त्यांना पुन्हा सहभागी करून घेण्यासाठी उत्सुकता दर्शवली असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पात रहिवाशी आणि उद्योग, व्यवसायांची एकमेकांशी असणारी नाळ कायम राहण्यावर भर दिला जाणार आहे. प्रकल्पात तशी योजना आखण्यात येत आहे. व्यवसायाभिमुखता अवलंबलेल्या धारावीवासीयांना त्यातून उद्योग-व्यवसायात सक्रिय राहता येणार आहे. 'डीआरपी'मध्ये उद्योग-व्यवसायपूरक धोरण राबवण्यात येणार असून, त्यासाठी सवलतही देण्यात येणार आहे.

The Dharavi Redevelopment Project (DRP) has completed surveys of chamber-related shops, though surveys on private land remain stalled due to protests. Despite initial resistance, many businesses are now showing interest. DRP aims to support 3,000 local industries with a business-friendly policy and provide concessions to encourage participation.

Nav Rashtra • 28 Jun • Dharavi

# A plot to throw workers out of Mumbai

| 1 • PG | 177 • Sqcm | 292342 • AVE | 500.5K • Cir | Middle Center | Mumbai Plus |
|---|---|---|---|---|---|

Mumbai



घरांसाठी सरकार उदासीन ● राष्ट्रीय मिल मजदूर संघ आक्रमक; ९ जुलैला मोर्चा

## कामगारांना मुंबईबाहेर फेकण्याचा डाव

मुंबई, (वा.) मुंबईत गिरणी कामगारांना घरे देण्याबाबत राज्य सरकार उदासीन आहे. कामगाराला मुंबईबाहेर फेकण्याचा डाव असल्याचा आरोप करीत राष्ट्रीय मिल मजदूर संघ आक्रमक झाला आहे. राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे सचिन अहिर यांनी शुक्रवारी एक पत्रकार परिषदेत गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नी ९ जुलैला मुंबईत मोर्चा काढण्यात येणार असल्याचे जाहीर केले.

दीड लाख गिरणी कामगारांना मुंबईत घरे देणे शक्य नसल्यामुळे राज्य सरकारने मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) गिरणी कामगारांना घरे देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार वांगणी आणि शेलूमध्ये गिरणी कामगारांसाठी ८१ हजार घरे बांधण्यात येणार आहेत. मात्र ही घरे गिरणी कामगारांना मान्य नाहीत. त्यामुळे वांगणी आणि शेलूची घरे रद्द करण्याची मागणी राष्ट्रीय मिल मजदूर संघाने केली आहे. त्याच वेळी सरसकट गिरणी कामगारांना मुंबईतच घरे देण्याचीही मागणी केली आहे. याच मागणीसाठी ९ जुलै रोजी मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा राष्ट्रीय मजदूर संघाने शुक्रवारी केली. राणी बाग ते आझाद मैदान दरम्यान हा मोर्चा काढण्यात येणार आहे.

२५००० मुंबईत घरे
१५०००० गिरणी कामगारांचे काय?
८१००० वांगणी आणि शेलू

९.५ लाख रुपये मोजावे लागणार आहेत

**म्हाडाकडे पावणे २ लाख गिरणी कामगारांचे अर्ज**

म्हाडाकडे पावणे दोन लाख गिरणी कामगारांचे अर्ज दाखल झाले असून यातील केवळ २५ हजार गिरणी कामगारांच मुंबईत घरे देता येणार आहेत. त्यामुळे उर्वरित दीड लाख गिरणी कामगारांचे काय असा प्रश्न आहे. मुंबईत गिरण्यांच्या जागाच नसल्याचे म्हणत शेवटी राज्य सरकारने एमएमआरमध्ये गिरणी कामगारांना घरे देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी जागेचा शोध घेतला जात आहे. दरम्यान, ८१ हजार गिरणी कामगारांना घरे देण्यासाठी वांगणी आणि शेलू येथे दोन गृहप्रकल्प हाती घेतले आहे.

### मुंबईतच घरे द्या, वांगणी-शेलूची घरे रद्द करावीत

धारावी पुनर्विकासासाठी धारावीबाहेर मोठ्या प्रमाणावर जागा दिली जात आहे. घरांच्या निर्मितीसाठी मिठागरांसह अन्य जागा खुल्या केल्या जात आहेत. पण गिरणी कामगारांसाठी मात्र मुंबईत जागा नसल्याचे राज्य सरकार सांगत आहे. हा कामगारांवर अन्याय असून मिठागरासह अन्य पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत गिरणी कामगारांना मुंबईतच घरे द्यावीत, अशी मागणी यावेळी अहिर यांनी केली. तर वांगणी आणि शेलू येथील घरे तात्काळ रद्द करण्याचीही मागणीही त्यांनी केली. या मागणीकडे काणाडोळा करीत काही दिवसांपूर्वीच सरकारने म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावरून गिरणी कामगारांकडून अर्ज, समंती पत्र सादर करून घेण्यास सुरुवात केली आहे. या प्रक्रियेलाही कामगारांचा विरोध असून अर्ज वा समंतीपत्र सादर करु नयेत असे आवाहन गिरणी कामगारांना संघटनांकडून केले जात आहे. एकूणच गिरणी कामगारांच्या घरांबाबत राज्य सरकार उदासीन असून कामगाराला मुंबईबाहेर फेकण्याचा डाव असल्याचा आरोप करीत राष्ट्रीय मिल मजदूर संघ आक्रमक झाला आहे. राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे सचिन अहिर यांनी पत्रकार परिषदेत मोर्चाचे जाहीर केले.

The National Mill Workers Union will march in Mumbai on July 7, protesting the state government's plan to relocate mill workers to Vangani and Shelu. They demand housing within Mumbai, citing redevelopment projects like Dharavi. The union accuses the government of ignoring 1.5 lakh workers and pushing them out.

Mumbai Tarun Bharat • 28 Jun • Dharavi

# A one-step program to confuse Dharavi residents is currently underway

| 3 • PG | 68 • Sqcm | 8542 • AVE | 17.73K • Cir | Middle Center |
|---|---|---|---|---|

Mumbai

## धारावीकरांना संभ्रमात टाकण्याचा एककलमी कार्यक्रम सध्या सुरू

### राहुल शेवाळेंकडून प्रकल्प विरोधकांचा समाचार

**मुंबई, दि. २७ : विशेष प्रतिनिधी**

''सर्वेक्षणातील ७५ टक्के धारावीकर अपात्र झाले, असे म्हणणारे युवराज केवळ दहा टक्के सत्य सांगत आहेत. इतर ९० टक्के माहिती दडवून ठेवायची आणि धारावीकरांच्या मनात संभ्रम निर्माण करून महायुती सरकारवर टीका करायची, असा एककलमी कार्यक्रम सध्या सुरू आहे,'' अशी जोरदार टीका शिवसेना उपनेते आणि माजी खा. राहुल शेवाळे यांनी 'धारावी पुनर्विकास' प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांवर केली आहे.



दरम्यान, वास्तव हे बघा असे म्हणत शेवाळे यांनी सांगितले, ''धारावीतील सेक्टर ६ मधील गणेशनगर आणि मेघवाडी येथील ५०५ घरांचे सर्वेक्षण पूर्ण झाले. त्यातील २२९ घरे गृहनिर्माण लाभासाठी पात्र ठरविण्यात आली. ५६ घरे हस्तांतरण शुल्क भरल्यावर पात्र होणार आहेत. १३ सदनिकाधारकांना 'अनुदानित योजने'अंतर्गत, तर ५९ सदनिकाधारकांना परवडणाऱ्या भाडेतत्त्वावर धारावीबाहेर घरे मिळणार आहेत. सार्वजनिक शौचालय, मीटर रूम यांसारखी सुमारे ३८ बांधकामे पुनरावलोकनखाली आहेत. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे ही यादी अंतिम नसून याबाबत काही आक्षेप असल्यास संबंधित रहिवाशांना थेट 'डीआरपी' प्राधिकरणाकडे दाद मागता येईल. स्थानिकांच्या शंका, हरकतींचे समाधान केल्यावरच अंतिम यादी जाहीर होईल. त्यामुळे विरोधकांनी आताच भुई थोपटून काही उपयोग आहे का?'' असा सवाल शेवाळे यांनी उपस्थित केला आहे.

''मला मिळालेल्या माहितीनुसार, अत्यावश्यक कागदपत्रांपैकी काही कागदपत्रे सादर करू न शकलेल्या रहिवाशांनी जर आता उर्वरित कागदपत्रे प्राधिकरणाकडे सादर केली, तर त्यावर जरूर सकारात्मक निर्णय घेतला जाईल. महाविकास आघाडी सरकारने तर वरच्या मजल्यावरील सर्व धारावीकरांना प्रकल्पाबाहेर फेकण्याचा निर्णय घेतला होता. महायुती सरकारने जर हा निर्णय बदलला नसता, तर तुमच्यामुळे किती धारावीकरांचे संसार उघड्यावर पडले असते? हा प्रश्न युवराजांनी आणि सर्वच विरोधकांनी जरा स्वतःच्या मनाला विचारा. धारावीकरांना, मी पुन्हा एकच सांगतो. विरोधकांच्या भूलथापांना आणि अफवांना बळी पडू नका! 'धारावी पुनर्विकास' प्रकल्पात 'प्रत्येकाला घर देण्याचा' आपला शब्द महायुती सरकार जरूर पाळणार,'' असा विश्वासही राहुल शेवाळे यांनी व्यक्त केला आहे.

Rahul Shewale criticized those opposing the Dharavi redevelopment, claiming only 10% truth in their survey objections. He stated the current list isn't final and urged residents to submit pending documents to the DRP. Shewale appealed to Dharavikars not to be misled by rumors and promised a fair review process.

Loksatta • 28 Jun • Dharavi

## Adani Group gets Kurla Mother Dairy site

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 • PG | 110 • Sqcm | 429849 • AVE | 784.32K • Cir | Middle Left |

Mumbai

# कुर्ला मदर डेअरीची जागा अदानी समुहाला आंदण

## धारावीसाठी हजारो कोटींची जमीन ५७.८६ कोटीत; 'लोक चळवळी'चा आरोप

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** धारावीच्या पुनर्विकासाच्या नावाखाली मुंबईतील अनेक ठिकाणच्या जागा कवडीमोल दरात दिल्या जात आहेत. कुर्ला मदर डेअरीच्या जागेची किंमत १३०० ते १५००कोटी रुपये असताना ती केवळ ५७.८६ कोटी रुपयांना धारावी पुनर्विकास प्रकल्पाला (डीआरपी) पर्यायाने अदानी समूहाला धारावी पुनर्विकासासाठी देण्यात आल्याचा आरोप 'लोक चळवळी'ने केला आहे. हा मोठा जमीन घोटाळा असल्याचा आरोप करीत संघटनेने आता याविरोधात न्यायालयात धाव घेण्याचा विचार सुरू केला आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत धारावीतील अपात्र रहिवाशांचे मुंबईत अन्यत्र पुनर्वसन केले जाणार आहे. भाडेतत्त्वावरील घरांच्या माध्यमातून त्यांना घरे दिली जाणार असून या घरांची बांधणी अदानी समुहच्या नवभारत मेगा डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेडकडून (एनएमडीपीएल) केली जाणार आहे. त्यानुसार धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या (डीआरपी) माध्यमातून मुंबईतील विविध ठिकाणची १२०० एकर जागेची मागणी राज्य सरकारकडे करण्यात आली होती. या मागणीनुसार डीआरपीला मुलुंडसह अन्य काही ठिकाणच्या जागा देण्यात आल्या आहेत. यात कुर्ल्यातील मदर डेअरीच्या २१ एकर जागेचा समावेश आहे. ही जागा डीआरपीला हस्तांतरित करण्यात आली आहे.

ही जागा कवडीमोल दरात अदानीला आंदण दिल्याचा आरोप करीत कुर्लावासीय आक्रमक झाले आहेत. दरम्यान, तांत्रिकदृष्ट्या ही जमीन डीआरपीकडे हस्तांतरित झाली असून ही जमीन डीआरपीच्या नावे राहणार आहे. जमिनीसाठी अदानीच्या कंपनीने पैसे भरले असून जागेचा वापर याच कंपनीकडून होणार आहे. यातून अदानीलाच फायदा होणार असल्याचा दावा संघटनेने केला.

Lok Movement alleged a major land scam, claiming the Kurla Mother Dairy land, worth ₹5,000 crore, was handed to Adani's NMDPL for Dharavi redevelopment at just ₹5 crore. They accused the state of favoring Adani under the DRP and plan to challenge the deal in court over unfair land transfer.

# Channel Overview

## Business Channel

No Coverage in this segment

## Hindi Channel

No Coverage in this segment

## English Channel

No Coverage in this segment

# Channel Overview

## Regional & Others Channel

| Total Clip | Top Channel |
|---|---|
| **11** | **Lokshahi Marathi (5)** |

| | | |
|---|---|---|
| 1. | Lokshahi Marathi | 5 |
| 2. | Jai Maharashtra | 2 |
| 3. | Saam | 2 |
| 4. | ABP Majha | 2 |

**Lokshahi Marathi**
**Dharavi**




Dharavi Rehabilitation Project: Ineligible Dharavi slum dwellers meet Aditya Thackeray.

News • Marathi • 09:37 AM 28 Jun, 2025

**Lokshahi Marathi**
**Dharavi**




Dharavi Rehabilitation Project: Ineligible Dharavi slum dwellers meet Aditya Thackeray.

News • Marathi • 08:36 AM 28 Jun, 2025

**Jai Maharashtra**
**Dharavi**




Shiv Sena leader Aaditya Thackeray briefing the public on Dharavi Rehabilitation Project.

News • Marathi • 07:49 AM 28 Jun, 2025

**Saam**
**Dharavi**




First list of eligible people for Dharavi Rehabilitation Project is announced.

Breaking News • Marathi • 07:37 AM 28 Jun, 2025

**Lokshahi Marathi**
**Dharavi**




Dharavi Rehabilitation Project: Ineligible Dharavi slum dwellers meet Aditya Thackeray.

News • Marathi • 07:34 AM 28 Jun, 2025

**Jai Maharashtra**
**Dharavi**




Shiv Sena leader Aaditya Thackeray briefing the public on Dharavi Rehabilitation Project.

News • Marathi • 07:16 AM 28 Jun, 2025

**ABP Majha**
**Dharavi**




First list of eligible people for Dharavi Rehabilitation Project is announced. Ineligible Dharavi slum dwellers meet Aditya T...

News • Marathi • 07:07 AM 28 Jun, 2025

**Lokshahi Marathi**
**Dharavi**




First list of eligible people for Dharavi Rehabilitation Project is announced. Ineligible Dharavi slum dwellers meet Aditya T...

Breaking News • Marathi • 06:37 AM 28 Jun, 2025

**Lokshahi Marathi**
**Dharavi**




Dharavi Rehabilitation Project: Ineligible Dharavi slum dwellers meet Aditya Thackeray.

News • Marathi • 06:37 AM 28 Jun, 2025

**Saam**
**Dharavi**




First list of eligible people for Dharavi Rehabilitation Project is announced.

Breaking News • Marathi • 06:32 AM 28 Jun, 2025

**ABP Majha**
**Dharavi**




Dharavi Rehabilitation Project: Ineligible Dharavi slum dwellers meet Aditya Thackeray.

News • Marathi • 06:05 AM 28 Jun, 2025

## Online Coverage

| No | Portal Name | Headline (Incorporated with URL) | Reach |
|---|---|---|---|
| 1. | Saamana | धारावी पुनर्विकास हा जगातील सर्वात मोठा जमीन घोटाळा, आदित्य ठाकरे यांचा हल्ला | 1.2M |
| 2. | Marathi News Daily | धारावी पुनर्विकास हा जगातील सर्वात मोठा जमीन घोटाळा, आदित्य ठाकरे यांचा हल्ला | N/A |
| 3. | हिंदी सामना | भाजपा धारावी को बना रही है जमीन घोटाले का अड्डा!..अडानी का विरोध तो करेंगे ही...आद... | N/A |